# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१४४९

**अपिलार्थी श्री. महेंद्र मधुकर शहाणे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
परिक्षा विभाग (वाणिज्य), महात्मा फुले भवन, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी कलिना, मुंबई-४०० ०९८

**प्रथम अपिलीय अधिकारी**
परिक्षा विभाग (वाणिज्य), महात्मा फुले भवन, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी कलिना, मुंबई-४०० ०९८

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.११.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २९.१०.२०२३ | ०६.११.२०२३ | ०८.१२.२०२३ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १५.०१.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. २९.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *मुद्दा क्र. (१)- सन २०१८ – २३ या बी.एम.एस.- एम.बी.ए. च्या बॅचला सेमिस्टर २, ३, ४, ५, ६ ,९, १० या परीक्षेसाठी फी किती होती व किती घेतली? त्याची पावती कोणाकोणाला दिली हे कळवावे व नसेल दिल्यास ती कधी देणार? सेमिस्टर ९ व १० मध्ये परीक्षा फी किती होती लेट फी किती होती याचे वर्गीकरण सांगावे. मुद्दा क्र. (२) सन २०१८- २३ या कालावधीत घेतलेल्या 'इंडस्ट्रियल विझीट' या हेड अंतर्गत किती फी जमा झाली व या कालावधीत किती भेटी झाल्या याचा तपशील द्यावा (कोरोना कालावधीतही फी घेतलेली आहे. भेटी झाल्या नसल्यास ती विद्यार्थ्यांना का परत नाही केली हे कळवावे.) मुद्दा क्र. (३) माझ्या मुलाने नाव- मंदार म. शहाणे "ट्रान्सफर सर्टिफिकेट" चा अर्ज करूनही आजपर्यंत देण्यात आलेले नाही ते कधी मिळणार आहे? मुद्दा क्र. (४) माझ्या मुलाने ग्रंथालय परतावा अर्ज करूनही आजपर्यंत देण्यात आलेले नाही ते कधी मिळणार आहे? मुद्दा क्र. (५) बी.एम.एस तिसऱ्या वर्षीची (सन २०२०-२१) फी पावती कोणाकोणाला देण्यात आली आहे हे कळवावे व न दिल्यास ती पावती कधी देणार? मुद्दा क्र. (६) आजपर्यंत मुंबई युनिव्हर्सिटी ठाणे कॅम्पस येथे किती कंपन्यांना मुलाखतीसाठी बोलावण्यात आले व आज पर्यंत कॅम्पसद्वारे किती विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळाल्या? (सन २०१९ ची ५ नावे सोडता जी संकेतस्थळावर उपलब्ध आहेत) मुद्दा क्र. (७) ईडब्ल्यूएस अंतर्गत येणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्य शासनाकडून फ्रीशिप देण्यात*

..२/-

*येते त्यासाठी डीबीटी पोर्टलवर विद्यापीठाचे नाव समाविष्ट नसल्याने विद्यार्थ्यांना राज्य शासनाकडून फ्रीशिप मिळाली नाही, तरी नाव समाविष्ट करण्यासाठी आपण काय प्रयत्न केले नसले केल्यास कधी करणार? मुद्दा क्र. (८) बी.एम.एस. एम.बी.ए. अभ्यासक्रमाअंतर्गत बी.एम.एस पूर्ण झाल्यानंतर किती जणांनी कोर्स सोडून दिला व त्याची कारणे काय आहेत? मुद्दा क्र. (९) वरील अभ्यासक्रम ठाणे महानगरपालिका परिवहन विभागाकडे समाविष्ट नसल्याने ठाणे रेल्वे स्टेशन ते रुणवाल गार्डन व इतर ठिकाणाहून येणाऱ्या बसमध्ये विद्यार्थ्यांना सवलतीचा पास देण्यासंबंधित ठाणे महानगरपालिका परिवहन विभागास पत्रव्यवहार केला आहे का नसल्यास का केला नाही?*

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. ०८.१२.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी सादर केले की, अपिलार्थींचा माहिती अर्जाचा विषय ठाणे उपपरिसर, मुंबई विद्यापीठ, ठाणे संबंधीत असल्याने अपिलार्थींचा माहिती अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की, त्यांच्याकडून अपिलार्थींना चुकीचे नावाने (त्यांच्या मुलाच्या नावाने) उत्तर दिलेले आहे. परंतु त्यांचा पत्ता एकच आहेत.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि, त्यांनी त्यांचा ईमेल आयोगास सादर करुन सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली आहे. यापुर्वी दि. ३१.१०.२०२५ रोजीची सुनावणीही अपिलार्थींच्या विनंतीनुसार पुढे ढकलून आज ठेवण्यात आली होती. अपिलार्थींचा माहिती अर्जाचा विषय व जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर पाहता अपिलार्थींची विनंती अमान्य करण्यात येत आहे.

५. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींचे नावामध्ये चुक दुरुस्त करुन दि. ०६.११.२०२३ रोजीचे पत्र पुन्हा अपिलार्थींना नोंदणीकृत टपालाने पाठवावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

पदीप व्यास 27-11-2025

**मुंबई**
**दिनांक : २७.११.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**